MHKO100001072014

## रे.क.नं. ५१/२०१४ मधील निशाणी क्र. ५७ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचा अर्ज वाचला. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जावर आपले म्हणणे सादर केले नाही.

३. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ६ द्रौपदी आप्पाजी पाटील ह्या दिनांक १९/०९/२०१४ रोजी मयत झालेल्या आहेत. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. वादी यांनी मयतांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून अगर हेतुपुरस्सर विलंब अगर टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी क्र. ६ ह्या राहणेस दुस-या गावी होत्या. वादी यांना मयताचे वारस मुदतीत आणवे लागतात याची माहिती नव्हती. सबब वादी यांनी प्रतिवादी क्र. ६ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

४. वादी यांनी सदरचा दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ६ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. ६ चे वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे सदरचा अर्ज प्रतिवादी यांना खर्चादाखल काही रक्कम देणेच्या अटीवर मंजूर न्यायोचीत वाटत आहेत. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

**१) वादी यांचा निशाणी क्र. ५७ वरील अर्ज प्रतिवादी यांना रक्कम रुपये ३००/- खर्च देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.**

**२) सदरचे प्रकरण हे जुने असलेने वादी यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत जमा करावी. वादी यांनी सदरची रक्कम पुढील तारखेपर्यंत जमा न केलेस सदरचा आदेश आपोआप रद्दबातल समजणेत यावा.**

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2023.01.23 17:14:12 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक २३/०१/२०२३

(म. ता. खराडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज

MHKO100001072014

## <u>रे.क.नं. ५१/२०१४ मधील निशाणी क्र. ५८ वरील आदेश</u>

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचा अर्ज वाचला. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केलेले नाही.

३. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ६ द्रौपदी आप्पाजी पाटील हे दिनांक १९/०९/२०१४ रोजी मयत झालेले आहेत. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. वादी यांनी मयतांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून अगर हेतुपुरस्सर विलंब अगर टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी क्र. ६ ह्या राहणेस दुस-या गावी होत्या. वादी यांना मयताचे वारस मुदतीत आणवे लागतात याची माहिती नव्हती. सबब वादी यांनी प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेची विनंती केली आहे.

४. वादी यांनी सदरचा दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरचा दावा वाटपासाठी दाखल केला असल्यामुळे दाव्यात सर्व पक्षकार आवश्यक पक्षकार आहेत. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्याकरीता प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होणे गरजेचे आहे. वादी यांचा निशाणी क्र. ५७ वरील अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेचा अर्ज त्यांचेवर खर्च बसवून मंजूर करणेत आला

आहे.त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

**वादी यांचा निशाणी क्र. ५८ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.**

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2023.01.23 17:14:20 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक २३/०१/२०२३

(म. ता. खराडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज

**MHKO100001072014**

## <u>रे.क.नं. ५१/२०१४ मधील निशाणी क्र. ५९ वरील आदेश</u>

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ द्रौपदी आप्पाजी पाटील यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी यांचा अर्ज वाचला. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे सादर केले नाही.

**३.** वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ६ द्रौपदी आप्पाजी पाटील ह्या दिनांक १९/०९/२०१४ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यांना अर्जात नमुद हेच सरळ व कायदेशिर वारस असून याशिवाय अन्य कोणीही वारस नाही.

**४.** वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपाकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. वादी यांचे निशाणी ५७ व ५८ वरील प्रतिवादी क्र. ६ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफीचा व अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेबाबतचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत . सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

### <u>आ दे श</u>

**१)** वादी यांचा निशाणी क्र. ५९ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी दाव्यात प्रतिवादी क्र. ६ च्या वारसाबाबत योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत सत्वर दाखल करावी.

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2023.01.23 17:14:28 +0530

**ठिकाण — गडहिंग्लज** **(म. ता. खराडे)**
**दिनांक २३/०१/२०२३** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.गडहिंग्लज**